स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर
GOVT. DENTAL COLLEGE & HOSPITAL, CHH.SAMBHAJINAGAR
पत्ता : धन्वंतरीनगर, घाटी परीसर, छ.संभाजीनगर – 431 001
दुरध्वनी क्र.(०२४०) २४०२३८१/८२/८३ संकेतस्थळ-WWW.gdchaurangabad.com ईमेल-gdca८३@yahoo.com

जा.क्र.शादंमवरुछसं/लेखा/आयकर/दरपत्रक/ 2686-94 /२०२६ दि 3 JUL 2026

दर मागणीपत्र-

प्रति,

1) Kshivasara Management Services, 1st Floor A-3 Manohar Vastu, Tilak nagar, Opp. Hi Tech Computer, Chh.Sambhajinagar - 431001
2) S R Totala & Associates, 1/A Trupti Bungalow, Near SBI, Pundlik Nagar Road, Garkheda, Chh.Sambhajinagar -431005
3) G S T & Associates, 1st Floor, 679, Sahyadri Nagar, N-5, N-6 Mani Road, Cidco, Chh.Sambhajinagar – 431003.
4) Papel Work Private Limited, 17, Parvati chambers, Opp. Karishma Society, Karve Road, Kothrud, Pune – 411038.
5) G S Lohiya And Asso. Flat No.1, Siddhi Sai comples Near Savaji Hospital, Chh.Sambhajinagar.
6) S R K & Asso, 6-B Anand Plaza, Sutgirni Chowk, Chh.Sambhajinagar -431001.
7) Indapurkar, Associates Chartered Accountant,Calda Corner ,New Shreynagar,Chh.Sambhajinagar 431001
8) Website/Notice Board, GOVT. DENTAL COLLEGE & HOSPITAL, CHH.SAMBHAJINAGAR

विषय:- दरपत्रक मोहोदबंद लिफाफे सादर करणेबाबत.
संस्थेच्या आयकर कपातीचे (टीडीएस) विवरणपत्र तसेच जीएसटी विषयक कामे करुन आयकर विभागास दरमाही/तिमाही ऑनलाईन सादर करणे..

संदर्भ:- १) शासन निर्णय क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, मंत्रालय, मुंबई-३ दि.१७/०४/२०१५
२) उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-३/ उदयोग-४, दि. ०१ डिसेंबर, २०१६
३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भांखस २०२१/प्र.क्र.८/ उद्योग-४, दि.०७/०५/२०२१
४)कार्यालयीन मंजूर टिप्पनी दि.०३/०७/२०२६

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर या संस्थेचे सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाचे दि.०१/०४/२०२६ ते दि.३१/०३/२०२७ या कालावधीचे आयकर कपातीचे (टीडीएस) विवरणपत्र तसेच जीएसटी विषयक कामे करुन आयकर विभागास दरमाही/तिमाही ऑनलाईन सादर करणेकरिता तसेच संस्थेचे आयकर विषयक इतर कामे करणेकरिता सेवा पुरवठादार नेमणेकामी विहित पद्धतीने दरपत्रक मोहोरबंद लिफाफे मागविण्यात येत आहेत. पात्र दरपत्रकधारक या कार्यालयास मागणी केल्याप्रमाणे सेवा दरपत्रकातील अटीं व शर्तीच्या अधिन राहुन देणेस इच्छुक असल्यास आपला दरपत्रक मोहरबंद लिफाफा विहित मुदतीत या कार्यालयाच्या आवक शाखेत सादर करावा.

महत्त्वाच्या अटीं व शर्ती:-

१) दरपत्रक मोहोरबंद लिफाफा **दि. ३० जुलै, २०२६ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत** कार्यालयास पोहोचतील या बेताने पाठवावे, जाहिर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही/ग्राह्य धरले जाणार नाही.

२) सुचना फलकावरील जाहिर नोटीसप्रमाणे इच्छुक कंपनीस देखील दरपत्रक मोहोरबंद लिफाफा सादर करण्याची मुभा देण्यात येत आहे.

३) दरपत्रक मोहोरबंद लिफाफा **"अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,** छत्रपती संभाजीनगर" यांचे नावे विहित मुदतीत कार्यालयास सादर करावा. त्याचप्रमाणे दरपत्रक मोहोरबंद लिफाफ्यावर **" आयकर संबंधीची सेवा पुरविणेसाठीचेदरपत्रक"**, लिफाफा जमा करण्याचा अंतिम दिनांक, दरपत्रक धारकाच्या नावाचा शिक्का इ. नमुद असणे आवश्यक आहे.

४) प्राप्त झालेली दरपत्रक मोहोरबंद लिफाफे उघडण्याबाबतचा दिनांक व स्थळ आपणास यथावकाश कळविण्यात येईल. आपणास जर दरपत्रक मोहोरबंद लिफाफे उघडण्याच्या प्रक्रियेत सहभाग घ्यावयाचा असल्यास नियोजित वेळेत स्वखर्चाने उपस्थित रहावे.

५) दरपत्रक ग्राह्य/वैध कालावधी हा पुरवठा आदेश नोंदविलेल्या दिनांकापासून सहा(६) महिन्यांचा राहिल. तथापि ६ महीण्यानंतर आवश्यकता वाटल्यास पुनश्च ६ महीने मुदतवाढ देण्यात येईल.

६) प्रस्तावित बाबीसाठी दरपत्रकात आकारण्यात आलेले दर हे बाजारभावापेक्षा अधिक नसावेत.

७) दरपत्रकात उक्त कामकाजासाठी सर्व करांसहित एकुण दर दर्शविण्यात यावे. दरपत्रकात खाडाखोड करण्यात येऊ नये.

८) **दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात सादर करावयाचे दस्ताऐवज (Documents):-** जीएसटी(GST) क्रमांक असलेल्या अधिकृत लेटरहेड वर दरपत्रक सादर करावे. त्यासोबत (१) दुकानाचा परवाना/व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र, (२) जीएसटी प्राधिकारपत्र,

९) **देयकाची अदायगी(PAYMENT):-** विहित उद्दिष्टांतर्गत अनुदानाच्या उपलब्धतेनुसार अदायगी करण्यात येईल.

१०) अपवादात्मक परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही अटीं व शर्तीत आवश्यकतेनुसार अंशत: बदल करणे, अथवा प्राप्त झालेले दरपत्रक कोणतेही कारण न देता स्विकारणे/नाकारणे तसेच कोणत्याही स्तरावर दरपत्रक प्रक्रिया रद्द करणे इ. अधिकार संस्थाप्रमुख(अधिष्ठाता) निम्नस्वाक्षरीकार यांनी राखुन ठेवलेले आहेत.

११) संस्थेचे आयकर विषयक इतर कामे सुध्दा करावी लागतील.

(डॉ.एम.एस.इंदूरकर)
**अधिष्ठाता**
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,
छत्रपती संभाजीनगर

प्रत:- मा. आयुक्त,वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव.